International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# शिक्षण हक्क कायदा 2009 च्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणातील संरचनात्मक बदलांचा विश्लेषणात्मक अभ्यास (2016–17 ते 2020–21)

**प्रा. डॉ. राजधर टेमकर[1], ओंकार कोरवले[2]**
*[1]प्राचार्य, दादा पाटील राजळे महाविद्यालय, अदिनाथ नगर, तिसगाव*
*[2]संशोधक विद्यार्थी, पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर*
*Corresponding Author – प्रा. डॉ. राजधर टेमकर*
DOI - 10.5281/zenodo.18655382

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र राज्य हे भारतातील अत्यंत प्रगत राज्यांपैकी एक मानले जाते. अनेक क्षेत्रांमध्ये महाराष्ट्र राज्याने केलेली कामगिरी लक्षणीय आहे तसेच राज्याने प्रगतीच्या सर्वच निर्देशांकांवर आपली आघाडी सातत्याने कायम ठेवली आहे. प्रगत भारताचा चेहरा म्हणून महाराष्ट्र राज्याकडे पाहिले जाते. महाराष्ट्र राज्याची ही प्रगती सामान्यपणे औद्योगिक, व्यावसायिक, कृषी, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तसेच सहकार क्षेत्रातील प्रगतीच्या माध्यमातून दर्शविली जाते. यासोबतच शिक्षण क्षेत्राच्या संदर्भात महाराष्ट्र नेहमीच आघाडीवर राहिला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच महाराष्ट्रात शैक्षणिक चळवळ अत्यंत बळकट स्वरूपात प्रस्थापित झाली असून, अनेक शिक्षण सुधारकांनी महाराष्ट्राच्या शिक्षणाचा एक निश्चित दिशा, आकार आणि तत्त्वज्ञानाची बैठक देण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये मुख्यत्वे करून सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिबा फुले, आगरकर, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख यांसारख्या थोर विभूतींचा समावेश करता येईल. महाराष्ट्र शासन स्थापन झाल्यापासून शासनाने देखील आपल्या योजनांच्या माध्यमातून शिक्षणाच्या प्रगतीला एक निश्चित उभारी देण्याचा प्रयास केला आहे. या संदर्भात महाराष्ट्र राज्याची शैक्षणिक प्रगती आणि कामगिरी कशा स्वरूपाची आहे, त्यामध्ये झालेले बदल आणि सद्य स्थिती याविषयीचे विश्लेषण येथे करण्यात आलेले आहे.

**मुख्य शब्द - शिक्षण हक्क, प्राथमिक शाळा, शिक्षक-विद्यार्थी अनुपात, शालेय नोंदणी घट, स्त्री शिक्षण.**

**संशोधन पद्धती:**

सदर संशोधन वर्णनात्मक व विश्लेषणात्मक (Descriptive–Analytical) स्वरूपाचे असून, शिक्षण हक्क कायदा 2009 च्या पार्श्वभूमीवर प्राथमिक शिक्षणातील संरचनात्मक बदलांचा अभ्यास करण्यावर भर देण्यात आला आहे. या संशोधनासाठी मिश्र पद्धतीचा (Mixed Method Approach) अवलंब करण्यात आला आहे.

संशोधनासाठी दुय्यम माहिती (Secondary Data) ही प्रमुख माहितीस्रोत म्हणून वापरण्यात आली आहे. यामध्ये शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे सांख्यिकी अहवाल, UDISE+ अहवाल, शैक्षणिक वर्षनिहाय सरकारी दस्तऐवज, तसेच संशोधन लेख, पुस्तके आणि अधिकृत संकेतस्थळांवरील माहितीचा समावेश आहे. 2016–17 ते 2020–21 या कालावधीतील प्राथमिक शाळांची संख्या, शिक्षक संख्या, विद्यार्थी-शिक्षक

अनुपात व विद्यार्थिनींच्या नोंदणीचे प्रमाण यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

संकलित माहितीचे तक्ते व टक्केवारी पद्धतीने विश्लेषण करून कालानुक्रमिक बदल स्पष्ट करण्यात आले आहेत. संख्यात्मक विश्लेषणासोबतच, धोरणात्मक व सामाजिक संदर्भ लक्षात घेऊन गुणात्मक विश्लेषण करण्यात आले आहे. संशोधनामध्ये प्राप्त निष्कर्षांची तुलना शिक्षण हक्क कायदा 2009 मधील तरतुदींशी करण्यात आली आहे.

अभ्यासाच्या आधारे निष्कर्ष काढून त्यानुसार उपाययोजना व शिफारसी सुचविण्यात आल्या आहेत. ही संशोधन पद्धती प्राथमिक शिक्षणातील वास्तव परिस्थिती समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरते.


**महाराष्ट्रातील एकंदर प्राथमिक शाळांची संख्या आणि त्यामध्ये घडून आलेला बदल:**

2016-17 या वर्षापासून महाराष्ट्रात कशा प्रकारचे शैक्षणिक बदल घडून झाले आहे याचा येथे आढावा घेणे अत्यंत उपयुक्त सिद्ध होईल. विशेषत्वाने शिक्षणाचा मुलाधार मानलेल्या प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात कोणत्या प्रकारचा बदल घडून आला आहे? बालकांना योग्य प्रकारचे शिक्षण देण्याकरिता शासनाची यंत्रणा एकंदरीत यशस्वी आहे किंवा कसे? हे जर समजून घ्यावयाचे असेल तर शासनाने प्राथमिक शाळांची संख्या आणि त्याची एकंदर रचना यामध्ये झालेला बदल समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. 2016-17 या वर्षापासून तर 2020-21 पर्यंत प्राथमिक शिक्षण संस्थांच्या संख्येत महाराष्ट्रात कशाप्रकारचे परिवर्तन झाले आहे याची माहिती सोबतच्या तालिकेमध्ये सादर करण्यात आली आहे-

| **वर्ष** | **एकूण प्राथमिक शाळा** | **सांखिकी बदल** | **टक्केवारीतील बदल** |
|---|---|---|---|
| 2016-17 | 1,04,971 | - | - |
| 2017-18 | 1,06,546 | 1575 | 1.48% |
| 2018-19 | 1,06,237 | -309 | -0.29% |
| 2019-20 | 1,06,491 | 254 | 0.23% |
| 2020-21 | 1,06,338 | -153 | -0.14% |

स्त्रोत- महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल, 2019-20, 2020-21 व 2021-22

त्यासोबत या बदलांच्या टक्केवारीतील स्वरूपाला देखील सोबतच्या तालिके मध्ये व्यक्त करण्यात आले आहे-




तालिका क्रमांक एक व दोन मध्ये दिलेल्या माहितीचे जर योग्य विश्लेषण केले तर असे लक्षात येते, की महाराष्ट्र शासनाच्या एकंदरीत शैक्षणिक धोरणाचा परिणाम स्वरूप शिक्षण संस्थांची संख्या सातत्याने वाढत आहे. परंतु, ही वाढ अत्यंत अल्प स्वरूपाची आहे हे निश्चितच लक्षात घेतले पाहिजे. 2016-17 साली 1,04,971 शिक्षण संस्था होत्या त्यामध्ये 2017-18 मध्ये 1575 अतिरिक्त नवीन शिक्षण संस्थांची स्थापना झालेली आढळून येते. हे प्रमाण अत्यल्प म्हणजेच 1.48% एवढेच आहे. या उलट त्यानंतर

ही परिस्थिती अधिकच विपरीत झाली आहे आणि 2018-19, 2019-20 आणि 2020-21 या वर्षांमध्ये शिक्षण संस्थांच्या संकेत घट झाल्याचे लक्षात येते. ही घट सामान्यपणे -0.29 % ते -0.14% या प्रमाणात झालेली आहे. एकंदरीतच ही बाब निश्चितच समाधानकारक नाही. शिक्षण संस्थांचा विकास हा देशाच्या प्रगतीच्या विकासाचा निर्देशांक असतो अशा परिस्थिती शिक्षण संस्थेची संख्या घटने हे एक प्रकारे शिक्षणाच्या मूलभूत संकल्पनेला आणि विकासावरच घात करण्यासारखे आहे. प्राथमिक शाळांच्या झालेल्या टक्केवारीतील बदलाची माहिती तालिका क्रमांक दोन मध्ये दर्शविली आहे. या माहितीचे विश्लेषण केल्यास असे लक्षात येते की, सातत्याने महाराष्ट्राच्या एकंदरीतच शिक्षण संस्थांचे स्वरूप हळूहळू विपरीत विपरीत परिस्थितीकडे जात आहे. शासनाने या संदर्भात गंभीरपणे विचार केला नाही आणि शिक्षण संस्थांची संख्या सातत्याने वाढावी या दृष्टिकोनातून निश्चित प्रयास न केल्यास याचा एकंदरीतच प्राथमिक शिक्षणाच्या अवस्थेवर लक्षणीय विपरीत प्रभाव होईल आणि शिक्षण प्राप्त करू इच्छिणाऱ्या बालकांना शिक्षणाच्या सुविधांपासून वंचित होण्याची शक्यता निर्माण होईल.


**प्राथमिक शाळांमध्ये झालेल्या एकंदर नोंदणींची संख्या:**

प्राथमिक शाळांचे यश हे मुख्यत्वेकरून या शाळांमध्ये एकूण किती विद्यार्थ्यांची निंदणी झालेली आहे आणि या नोंदणीच्या प्रमाणात कशा प्रकारचे बदल झाले आहेत यावरून लक्षात घेता येते. एखाद्या शिक्षण संस्थेत अथवा एकंदरीत शिक्षण रचनेत जर विद्यार्थ्यांच्या नोंदणीच्या संख्येत सातत्याने वाढ होत असेल, तरच ही बाब समाधानकारक मानली जाते. या दृष्टिकोनातून 2016-17 ते 2020-21 या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कशा प्रकारे बदललेली आहे याचे विश्लेषण सोबतच्या तालिकांमध्ये करण्यात आले आहे-

| वर्ष | नोंदणीकृत विद्यार्थी संख्या (लाख) | संख्येतील बदल | टक्केवारीतील बदल |
|---|---|---|---|
| 2016-17 | 159.9 | - | - |
| 2017-18 | 159.1 | -0.8 | -0.5 |
| 2018-19 | 157.4 | -1.7 | -1.08 |
| 2019-20 | 156.9 | -0.5 | -0.3 |
| 2020-21 | 153.9 | -3 | -1.94 |

स्त्रोत- महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल 2029-20, 2020-21, व 2021-22

नोंदणीकृत विद्यार्थ्यांच्या टक्केवारीत झालेला बदल पुढील तालिकेत दर्शविला आहे-




तालिका क्रमांक तीन आणि चार या तालिकांचे जर सखोल आणि सूक्ष्म विश्लेषण केले, तर असे लक्षात येते की, 2016-17 साली एकंदरीतच नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या 159.9 लक्ष एवढी होती. परंतु 2020-21 मध्ये ती घटून 153.9 एवढी झाली आहे. वास्तविक पाहता लोकसंख्येच्या एकंदरीतच आकारमानात जेव्हा सातत्याने वाढ होत आहे अशावेळी बालकांच्या शालेय नोंदणी घट होणे ही बाब आश्चर्याचीच मानली पाहिजे. एक प्रकारे

शासनाचे विद्यार्थ्यांच्या प्राथमिक शाळेतील नोंदणीकडे दुर्लक्ष झाले आहे, बालकांना शिक्षणाचा हक्क मिळवून देण्याचा शासनाने केलेले प्रयत्न पर्याप्त नाहीत हीच बाब यावरून अधोरेखित होते. शासनाच्या या उदासीन धोरणामुळे प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या संस्थेतील विद्यार्थ्यांच्या संख्येत होणारी गट एक प्रकारे मोठ्या प्रमाणात निरक्षरतेला आणि अज्ञानाला पूरक सिद्ध होणारी आहे. याकरिता शासनाने ही बाब लक्षात घेऊन नोंदणीची प्रक्रिया अधिक प्रखरपणे राबविणे आवश्यक आहे. प्राथमिक शाळेतील बालकांची नोंदणी संख्या जर वाढली तर प्रौढ निरक्षरतेचे प्रमाण निश्चितपणे कमी करता येईल. त्यासोबतच साक्षरतेचा, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आणि समाजाला हितकारक असणाऱ्या विचारसरणीचा प्रसार करता येईल. साक्षरता वाढविण्याकरता प्राथमिक शाळेत नोंदणी सातत्याने वाढविटतनेणे आवश्यक आहे. इतर विकसित देशांचा अथवा प्रांतांचा विचार केला तर महाराष्ट्राच्या दृष्टिकोनातून ही बाब निश्चितच खेदजनक आहे.


## प्राथमिक शाळांमधील विद्यार्थिनींच्या नोंदणीचे प्रमाण:

स्त्री शिक्षण हा महाराष्ट्राच्या जिव्हाळ्याचा विषय प्रारंभा पासूनच राहिला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून स्त्रियांना शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी, स्त्रियांना शिक्षणाच्या हक्क प्राप्त झाला पाहिजे याकरिता अनेक शिक्षण तज्ञांनी तसेच समाजसुधारकांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. सावित्रीबाई फुले यांच्या अथक प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेड रोवली गेली. महाराष्ट्र अशा प्रकारचे प्रयत्न करणारे देशातील पहिल्या राज्यांपैकी एक आहे. ही बाब लक्षात घेता महाराष्ट्राचा स्त्री शिक्षणाचा इतिहास दैदीप्यमान आहे. परंतु, या दृष्टिकोनातून सदय परिस्थितीत मुलींच्या शिक्षणाची परिस्थिती काय आहे याची देखील अध्ययन करणे आवश्यक आहे आणि त्यावरूनच महाराष्ट्रातील विद्यार्थिनींच्या शिक्षणाची सदय परिस्थिती आणि त्यात झालेल्या सुधार याचे नेमके आकलन करून घेता येईल. 2016-17 ते 2020-21 या कालावधीमध्ये विद्यार्थिनींची शालेय शिक्षणा संदर्भात झालेल्या नोंदणीची माहिती तालिका क्रमांक पाच मध्ये सादर करण्यात आली आहे.

| वर्ष | नोंदणीकृत विद्यार्थिनींचे प्रमाण | संख्येतील बदलाचे प्रमाण |
|---|---|---|
| 2016-17 | 46.9 | - |
| 2017-18 | 46.8 | -0.1 |
| 2018-19 | 46.9 | 0.1 |
| 2019-20 | 47.0 | 0.1 |
| 2020-21 | 47.1 | 0.1 |

स्रोत- महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल 2029-20, 2020-21, व 2021-22

नोंदणीकृत विद्यार्थिनींच्या प्रमाणातील बदल पुढील तालिकेत दर्शविला आहे-




या तालिकेतील माहितीवरून असे लक्षात येते की, 2016-17 साली एकंदर नोंदणीकृत विद्यार्थ्यांमध्ये विद्यार्थिनींचे प्रमाण 46.9% एवढे होते. म्हणजेच ते 50% पेक्षा कमी होते. ते 2020-21 पर्यंत वाढून 47.1 एवढे वाढले म्हणजे 0.2 टक्क्यांनीच केवळ वाढ झालेली आहे. हि वाढ अत्यल्प आहे याचाच अर्थ असा की स्त्री शिक्षणाकडे विशेषतः बालिकांच्या शिक्षणाकडे शासनाने ज्या सकारात्मक दृष्टिकोनातून लक्ष देणे आवश्यक आहे

तशा प्रकारची लक्ष देण्यात शासनाला अपयश आले आहे. अद्यापही मोठ्या प्रमाणात मुलींना योग्य प्रकारचे शिक्षण मिळण्यात अनेक अडचणी निर्माण होत आहेत. शिक्षणापासून मुलींना अशा प्रकारे वंचित करणे म्हणजे समाजाच्या अर्ध्या लोकसंख्येला साक्षरते पासून वंचित करणे आहे. एका समृद्ध, साक्षर आणि सुशिक्षित व सुसंस्कृत समाजाच्या निर्मितीत स्त्रियांचा सहभाग निश्चितच मोठ्या प्रमाणात असतो. ही बाब लक्षात घेता मुलींच्या शिक्षणाबाबत शासनाची उदासीनदार विचार करण्यासारखी आहे.


**प्राथमिक शाळांतील शिक्षकांची संख्या**:

शालेय शिक्षणाचा दर्जा हा मुख्यत्वेकरून शिक्षकांची संख्या त्यांचे व्यक्तिमत्व, त्यांचा शिक्षणाप्रती असणारा दृष्टिकोन आणि त्यांना प्राप्त झालेले प्रशिक्षण यासारख्या विविध गोष्टींवर अवलंबून असतो. जर विद्यार्थी-शिक्षक हा अनुपात समाधानकारक असेल तर निश्चित शिक्षक विद्यार्थ्यांचे कार्य अधिक प्रभावीपणे करू शकतात. ज्यावेळी हा अनुपात विपरीत असतो त्यावेळी मात्र विद्यार्थ्यांच्या एकंदरीतच मानसिक व शारीरिक निकोप वाढीकडे शिक्षक लक्ष देऊ शकत नाहीत. जर शिक्षकांची संख्या एकंदरीत शैक्षणिक गरजांचे स्वरूप लक्षात घेता अत्यल्प असेल अथवा ती समाधानकारक नसेल याचा अर्थ एकंदरीत शिक्षणाची दुरावस्था झाली आहे. शिक्षण क्षेत्र हे दुर्लक्षित क्षेत्र आहे असे मानता येईल. या दृष्टिकोनातून महाराष्ट्र शासनाने या विविध प्राथमिक शाळा संचालित केल्या आहेत त्यामधील शिक्षकांच्या संख्येची मात्रा आणि तिचे स्वरूप याविषयीची माहिती तालिका क्रमांक सहा आणि सात मध्ये सादर केलेली आहे.

| **वर्ष** | **शिक्षकांची संख्या (लाखा मध्ये)** | **संख्येतील बदल** | **टक्केवारीतील बदल** |
|---|---|---|---|
| 2016-17 | 5.2 | - | - |
| 2017-18 | 5.4 | 0.2 | 3.70% |
| 2018-19 | 5.2 | 0.2 | -3.84% |
| 2019-20 | 5.3 | 0.1 | 1.88% |
| 2020-21 | 5.1 | -0.2 | -3.92% |

स्त्रोत- महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल 2029-20, 2020-21, व 2021-22

प्राथमिक शाळांतील शिक्षकांच्या संख्या बदलाची तालिक-




या तालिकेतील माहिती लक्षात घेता असे असे सहजपणे निदर्शनात येते की 2016-17 मध्ये एकंदर शिक्षकांची संख्या ही 5.2 लक्ष एवढी होती. परंतु 2020-21 मध्ये ती घसरून 5.1 लक्ष एवढी झालेली आहे. शिक्षकांच्या संख्येत खरे वास्तविक पाहता विद्यार्थ्यांची संख्या वाढली असताना वाढ होणे अपेक्षित आहे. असे न होता या उलट शिक्षकांच्या संकेत घट झाल्याचे लक्षात येते. ही घट होणे याचा अर्थ असा की शासनाने ज्या प्रमाणात शिक्षकांची भरती शिक्षण संस्थांमध्ये करावयास हवी होती अथवा त्याविषयीचे आग्रही आणि खंबीर धोरण स्वीकारावयास हवे होते, त्याबाबत शासनाने निश्चित स्वरूपाची भूमिका घेतलेली नाही. शासनाने शिक्षकांची भरती, शिक्षकांच्या शिक्षण संस्थेतील सहभाग याविषयी


आपल्या धोरणात एक प्रकारचा उदासीन दृष्टिकोन स्वीकारला आहे. पर्याप्त प्रमाणात शिक्षक उपलब्ध न होणे याचा अर्थ शिक्षणाच्या दर्जामध्ये मोठ्या प्रमाणात नकारात्मक बदल घडून येणे आहे. शिक्षणाचा दर्जा घसरण्यासाठी शिक्षकांची संख्या हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. जर शालेय शिक्षणासाठी पर्याप्त शिक्षकांची उपलब्धता नसेल, तर त्या शालेय शिक्षणाचा दर्जा उंचावण्याची संभावना राहणार नाही ही बाब लक्षात घेता शासनाने एकंदरीतच शिक्षक संकेत वाढ करण्याकरता ज्या प्रकारचे भरीव सकारात्मक प्रयत्न करावयास हवे होते ते केले नाही असे म्हणता येईल. या संदर्भातील दुसरी आणि महत्त्वाची बाब म्हणजे शिक्षकांच्या संख्येत ज्या प्रकारे प्रतिशत प्रमाण बदलले आहे तेही लक्षात घेण्यासारखे आहे. 2016-17 च्या तुलनेत 2020-21 पर्यंत शिक्षकांच्या संकेत नकारात्मक बदल झाला आहे असे लक्षात येते. हा बदल नकारात्मक असून -3.92 प्रतिशत एवढा आहे. याचाच अर्थ असा की ज्या प्रमाणात शिक्षकांची नियुक्ती व्हावयास हवी होती, ज्या संख्येने शिक्षक उपलब्ध करून द्यावयास हवे होते त्याविषयी शासनाने योग्य आकृतीबंधाची आखणी केलेली नाही. तसेच अशा प्रकारचा आकृतीबंध जरी धोरणात्मक स्वरूपात उपलब्ध असेल तरी त्याची प्रभावी अवलंबून आणि मात्र प्रत्यक्षात शासनाच्या द्वारे झालेली नाही. शालेय शिक्षणासाठी शिक्षकांची संख्या पर्याप्त प्रमाणात उपलब्ध नसणे एक प्रकारे शिक्षण व्यवस्थेकरिता लांच्छनास्पद असते ही बाब निश्चितच लक्षात घेतली पाहिजे.

**शिक्षक-विद्यार्थी अनुपात:**

उत्तम दर्याचे शिक्षण घेण्यासाठी सर्वात महत्त्वाची आणि नितांत आवश्यक पूर्वअट म्हणजे शिक्षक-विद्यार्थ्यांचा अनुपात अत्यंत सकारात्मक असला पाहिजे. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील अनुपात जर समाधानकारक असेल, जर शिक्षकांच्या शैक्षणिक कक्षेचा आवाका, त्यांची पात्रता आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची क्षमता या घटकांच्या तुलनेत जर हा अनुपात समाधानकारक असेल तरच शिक्षण विद्यादानाचे कार्य प्रभावीपणे करू शकतो. ज्यावेळी हा अनुपात विपरीत असतो त्यावेळी शिक्षक आपल्या शैक्षणिक कार्यामध्ये अपयशी होतो. विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष गरजा, त्यांची मानसिकता, त्यांची शिक्षणाची इच्छा आणि ग्रहण करण्याची शक्ती याबद्दल विचार न करता अत्यंत यांत्रिक पणे तो शिक्षणाची प्रक्रिया पूर्ण करीत जातो. एक प्रकारे शिक्षणाच्या माध्यमातून साक्षरता, जागरूकता, आणि वैचारिक उन्नती करण्याचे कार्य शिक्षकांकडून होत नाही, किमान साक्षरतेच्या पलीकडे या शिक्षणाची ध्येय साध्य होत नाही आणि म्हणून शिक्षक विद्यार्थी अनुपात अत्यंत समाधानकारक आणि उच्च दर्जाचा असला पाहिजे असे आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षण तज्ञ मानतात आणि त्या अनुषंगाने विविध देशांमध्ये तश्या प्रकारची तरतूदहि केली जाते. महाराष्ट्रा सारख्या शैक्षणिक दृष्ट्या प्रगत प्रांतामध्ये हा अनुपात कशा स्वरूपाचा आहे आणि यात सातत्याने सकारात्मक बदल झाले आहे किंवा कसे याची माहिती तालिका क्रमांक आठ मध्ये सादर केलेली आहे.

शिक्षक विद्यार्थी अनुपात:

| **वर्ष** | **शिक्षक-विद्यार्थी अनुपात** |
|---|---|
| 2016-17 | 30:1 |
| 2017-18 | 29:1 |
| 2018-19 | 30:1 |
| 2019-20 | 29:1 |
| 2020-21 | 30:1 |




या माहितीच्या माध्यमातून काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात येतात. 2016-17 साली शिक्षक विद्यार्थी अनुपात हा 30 विद्यार्थ्यांच्या मागे एक शिक्षक एवढा होता. आंतरराष्ट्रीय मानका प्रमाणे  हा अनुपात प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात तीस विद्यार्थ्यांच्या मागे एक शिक्षक एवढा हसला पाहिजे. ही बाब लक्षात घेता शिक्षकांवर येणाऱ्या कार्यभार अत्यंत जास्त आहे. शिक्षक आपल्या शैक्षणिक कौशल्याचा, पात्रतेचा, दृष्टिकोनाचा प्रभावी वापर करू शकत नाही.  विद्यार्थ्यांची आकलन क्षमता, बुद्धिमत्ता, ग्रहण क्षमता आणि वर्गातील शैक्षणिक कामगिरी सातत्याकडे शिक्षक लक्ष देऊ शकत नाही ही बाब स्पष्ट होते. 2020-21 साली सुद्धा हा अनुपात एवढाच राहिला आहे. याचाच अर्थ असा की या संपूर्ण कालावधीमध्ये शिक्षकांच्या संख्येत वाढ व्हावी आणि विद्यार्थी-शिक्षक अनुपात सुधारावा या दृष्टिकोनातून शासनाद्वारे कोणतीही भरीव पाऊल उचलण्यात आलेले नाही. शासन अद्यापही शिक्षक विद्यार्थी अनुपात सुधारावा या दृष्टिकोनातून आवश्यक उपाययोजना करण्यात अपयशी झालेले सिद्ध झाले आहे.

## निष्कर्ष:

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की प्राथमिक शिक्षणाचा विस्तार झाला असला, तरी शिक्षक संख्या व गुणवत्ता यावर विशेष लक्ष देणे अत्यावश्यक आहे. अन्यथा शिक्षण हक्क कायद्याचा अपेक्षित उद्देश पूर्णतः साध्य होणार नाही. राज्यात शाळा बंद होणे, विलीनीकरण, कमी पटसंख्या असलेल्या शाळांचे एकत्रीकरण ही प्रक्रिया सुरू असून, नवीन शाळा सुरू होण्याचा वेग तुलनेने मंद आहे. मुलींच्या शिक्षणाबाबत जागरूकता वाढत आहे, शालेय पातळीवर लैंगिक समता साध्य होण्याच्या दिशेने प्रगती होत आहे, परंतु या प्रगतीचा वेग मंद आहे. नवीन भरती न होणे, सेवानिवृत्ती, पदे रिक्त राहणे, कंत्राटी धोरणे यांचा परिणाम शिक्षक संख्येवर झालेला दिसतो. शाळांची संख्या तुलनेने स्थिर आहे, परंतु शिक्षक संख्येतील घट ही गंभीर बाब आहे. विद्यार्थिनींच्या नोंदणीत सुधारणा होत असून, ही सकारात्मक बाब आहे. शिक्षक-विद्यार्थी अनुपात अपेक्षित मानकांपर्यंत पोहोचलेला नाही.

## शिफारशी:

1) **शिक्षक भरती व मनुष्यबळ व्यवस्थापन बळकट करणे:** प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी शिक्षकांची पुरेशी संख्या असणे अत्यावश्यक आहे. सद्यस्थितीत शिक्षक संख्येत सातत्याने घट होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे रिक्त पदांची तातडीने भरती करणे गरजेचे आहे. सेवानिवृत्ती, बदली किंवा राजीनाम्यामुळे रिक्त होणारी पदे दीर्घकाळ रिक्त राहू नयेत यासाठी वार्षिक शिक्षक गरज आराखडा तयार करण्यात यावा. तसेच ग्रामीण, दुर्गम व आदिवासी भागात कार्यरत राहणाऱ्या शिक्षकांसाठी विशेष प्रोत्साहन योजना राबवाव्यात.

2) **शिक्षक–विद्यार्थी अनुपात सुधारण्यावर भर:** 30:1 असा शिक्षक–विद्यार्थी अनुपात अध्यापनाच्या दृष्टीने मर्यादित ठरतो. प्राथमिक स्तरावर 25:1 हा अनुपात साध्य करण्याचे धोरणात्मक उद्दिष्ट निश्चित करणे आवश्यक आहे. यासाठी अतिरिक्त शिक्षक नियुक्ती, बहुवर्गीय  अध्यापनावर नियंत्रण आणि शाळानिहाय विद्यार्थी संख्येप्रमाणे शिक्षकांचे समतोल वितरण करणे गरजेचे आहे. यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक लक्ष देणे शक्य होईल.

3) **शाळा विलीनीकरण धोरणात लवचिकता:** कमी पटसंख्या असलेल्या शाळांचे विलीनीकरण करताना केवळ आर्थिक निकष न लावता भौगोलिक अंतर, वाहतूक सुविधा, सामाजिक परिस्थिती आणि पालकांची भूमिका यांचा विचार करणे आवश्यक आहे. दुर्गम भागातील शाळा बंद झाल्यास गळतीचे प्रमाण वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे स्थानिक गरजांनुसार शाळा टिकवून ठेवण्याचे धोरण स्वीकारले पाहिजे.

4) **विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठी विशेष उपाय:** विद्यार्थिनींच्या नोंदणीत सकारात्मक बदल दिसून येत असला, तरी तो अधिक भक्कम करण्यासाठी विशेष उपाययोजना आवश्यक आहेत. शाळांमध्ये स्वतंत्र व सुरक्षित स्वच्छतागृहे, स्वच्छ पिण्याचे पाणी, आरोग्य तपासणी, शिष्यवृत्ती योजना आणि सुरक्षित शालेय वातावरण उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. माध्यमिक स्तरावर गळती रोखण्यासाठी समुपदेशन व पालक-जागरूकता कार्यक्रम राबवावेत.

5) **अध्यापन गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करणे:** केवळ शाळा व शिक्षकांची संख्या वाढवणे पुरेसे नसून अध्यापनाच्या गुणवत्तेत सुधारणा करणे तितकेच महत्त्वाचे आहे. शिक्षकांसाठी सातत्यपूर्ण प्रशिक्षण, शैक्षणिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, अध्ययन निष्पत्ती आधारित अध्यापन आणि नियमित शैक्षणिक मूल्यमापन यावर भर द्यावा. यामुळे शिक्षण हक्क कायद्याचा मूळ उद्देश दर्जेदार व सर्वसमावेशक शिक्षण प्रत्यक्षात साध्य होईल.

वरील उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास प्राथमिक शिक्षणातील संरचनात्मक अडचणी दूर होतील, शिक्षक–विद्यार्थी संतुलन सुधारेल आणि शिक्षण हक्क कायदा 2009 अधिक परिणामकारकपणे राबविता येईल. या उपाययोजना शैक्षणिक नियोजन व धोरणनिर्मितीसाठी मार्गदर्शक ठरू शकतात.

**संदर्भ सूची:**

1) देशपांडे, ना. गो. (2008). भारतीय शिक्षण व्यवस्था आणि समस्या. पुणे : विद्या प्रकाशन.
2) आगलावे, पी. एस. (2015). शिक्षण धोरण आणि कायदे. पुणे : नित्य नूतन प्रकाशन.
3) पाटील, बी. आर. (2011). शिक्षण आणि सामाजिक न्याय. कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
4) Government of India. (2009). The Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009. New Delhi: Ministry of Law and Justice.
5) ASER Centre. (2022). Annual Status of Education Report (Rural). New Delhi: ASER Centre.
6) Government of Maharashtra. (2021). Educational Statistics of Maharashtra (2016–17 to 2020–21). Mumbai: School Education Department.
7) Government of Maharashtra. (2020). Sarva Shiksha Abhiyan / Samagra Shikshan Abhiyan: Annual Report. Mumbai: School Education Department.
8) Government of India. (2021). UDISE+ Flash Statistics: School Education in India 2020–21. New Delhi: Ministry of Education.